# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दि.19/07/2017 रोजी (का.प.क्र.04) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त</u>**

बुधवार दिनांक 19/07/2017 रोजी (का.प.क्र.04) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 3.15 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग (अति.आयुक्त), नगर सचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
12. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेचे स.सभागृह नेते श्री.गजानन मनगटे यांचे वडीलांचे दु:खद निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे, श्री.सिताराम सुरे,श्री.राजगौरव वानखेडे : अनुमोदन देण्यात येते.

मा.सभापती :स.सदस्य श्री.गजानन मनगटे यांचे वडीलांचे दु:खद निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी. (सभागृहाच्या वतीने दोन मिनट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात येते.)

मा.सभापती :सभागृहात शहरातील विविध विषयावर चर्चा होत असते, त्यामुळे सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. सभागृहात उपस्थित राहणे बाबत सर्व संबधीत अधिकाऱ्यांना आदेशित करण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :बडी गिरणी येथील शाळेचा स्लॅब पडण्यास आलेला आहे, त्या ठिकाणी पाहणी करण्यासाठी कुणीही आलेले नाही. कार्यवाही का करण्यात आलेली नाही. खुलासा करण्यात यावा, एखादी दुर्घटना घडल्यास प्रशासन जबाबदार राहील. शाळेत 200 विद्यार्थी संख्या आहे.

श्री.सिध्दांत शिरसाठ :माझ्या वार्डात जुनी भाजी मंडई येथे जुने झोन कार्यालय होते त्या ठिकाणी 25 दुकाना आहेत सदरील इमारत कोसळण्याच्या स्थितीत आलेली आहे. याबाबतीत अधिकाऱ्यांना पत्र व्यवहार केलेले आहे. कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

शिक्षणाधिकारी :एन-7 येथील शाळेची पाहणी केलेली आहे. इस्टीमेट तयार केलेले आहे. संबधीत विभागाला कळविण्यात आलेले आहे.

वार्ड इंजिनिअर :इस्टिमेट तयार करून पाठविलेले आहे. चार वेळेस निविदा कॉल केलेली आहे. प्रतिसाद मिळालेला नाही.

मा.सभापती :काम तातडीने होण्याकरीता शहर अभियंता यांनी लक्ष द्यावे. अत्यावश्यक सेवेमध्ये 67 (3) (c) मध्ये काम करण्यात यावे.

मा.सभापती :पहाणी करून तातडीने कार्यवाही करण्यात येईल. स.सदस्य श्री.सिध्दांत शिरसाठ यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबतीत मालमत्ता अधिकारी यांनी खुलसा करावा.

मालमत्ता अधिकारी :धोकादायक इमारती बाबतचा अहवाल मा.शहर अभियंता यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

शहर अभियंता :स्ट्रक्चर ऑडीटकरीता तातडीने कार्यवाही करण्यात येईल त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्य यांनी पत्र देवुन एक महिना उलटलेला आहे. मालमत्ता विभागाने अहवाल शहर अभियंता यांचेकडे वर्ग केलेला आहे. परंतु अहवाल अजुन पाहिलेला नाही. इमारत पडल्यास जबाबदारी कुणाची? हलगर्जीपणाने काम करून चालणार नाही. ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :पहाणी करून ताबडतोब स्ट्रक्चर ऑडीट करण्यात यावे व अहवालानुसार तातडीने पुढची कार्यवाही करण्यात यावा यासंबधीचा अहवाल स्थायी समितीसमोर सादर करावा.

श्री.सिताराम सुरे :एन-5 येथील लाईट वारंवार का खंडीत होते. दोन फिटर आहेत. फिटर का बंद होते.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (पा/पू):दोन फिटर लाईन पैकी एक फिटर लाईन दोन वर्षापासून बंद आहे. फिटर लाईन चालू करण्याबाबत कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

मा.सभापती :दोन फिटर लाईन पैकी एक दोन वर्षापासून बंद आहे. का काळजी घेण्यात आली नाही.

कार्य.अभियंता (पा/पू):तात्काळ पाहणी करण्यात येवुन प्रश्न सोडविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :ताबडतोब पाहणी करून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे:भुमिगतबाबत सविस्तर अहवालबाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :सदरील विषय अतिशय महत्वाचा आहे. गेल्या दोन बैठकीमध्ये सदर विषयाबाबत चर्चा होत आहे. अहवालाबाबत प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :मागील बैठकीत दिलेल्या सूचनेप्रमाणे माहिती आणलेली आहे. कॉलेज ऑफ इंजिनिअरींगने पाहणी केलेली आहे.रिपोर्टमध्ये संबधीतांनी ज्या सूचना केलेल्या होत्या, त्याची पुर्तता केलेली आहे. सॉफ्ट कॉपीमध्ये माहिती आणलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे:स्थायी समितीने आदेशित केल्यानुसार माहिती देण्यात यावी. अहवालावर अभ्यास करण्यासाठी वेळ लागणार आहे.

कार्य.अभियंता :उद्या सकाळपर्यंत सर्व स.सदस्यांना अहवाल देण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :अहवालावर अभ्यास करून पुढील बैठकीत चर्चा करण्यात येईल. टेक्निकल,फायनन्शीअल ऑडीट जोपर्यंत होत नाही तोपर्यंत यातील माहिती कळणार नाही. सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा. पीएमसीने सादर केलेली माहिती सभागृहासमोर येवु द्या.

मा.सभापती :पीएमसीने अहवाल सादर केलेला आहे का?

कार्य.अभियंता :पीएमसीला कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पीएमसीने वेळोवेळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शन या सर्व गोष्टींचा सविस्तर अहवाल देण्यात यावा. जेणे करून या योजनेमध्ये काय चालू आहे याची माहिती मिळेल.

मा.सभापती :टेक्निकल आणि Financial Audit संबधीचा विषय वारंवार सभेमध्ये येत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका वाचत असतांना असे निर्दशनास आले की, रेल्वे पटरी क्रॉसिंगसाठी 7.80 कोटी रूपयांचा Financially निर्णय घेण्यासाठी स्थायी समिती सक्षम आहे. मा.सर्वसाधारण सभेकडे सदरील विषय कशासाठी गेला माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता :मागील सर्वसाधारण सभेमध्येच प्रस्ताव पाठविलेला होता. सन 2013 च्या डिएसआर नुसार त्याची सूचना होती.3.50 कोटीचा प्रस्ताव तयार केला होता. त्यानंतर त्यांनी सविस्तर परवानगी दिली होती. वेगळी सूचना केली होती. रेल्वेच्या लॅंडमध्ये स्कॅपिंग कशी करायची, लेटेस्ट टेक्नोलॉजीचा वापर करायचा सूचना दिलेल्या आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :डिपीआर तयार करतांना पीएमसीचे काम होते विविध विभागाशी समन्वय साधुन काम करायचे होते परंतु पीएमसीने कुठल्याही विभागाशी संपर्क साधलेला नाही. अधिकचे 7.50 कोटी रूपये द्यायचे, पीएमसीवर कारवाई करायला पाहिजे.

कार्य.अभियंता :पीएमसीवर 60 लाख रूपयांची पेनॅल्टी लावलेली आहे. या संदर्भात पीएमसीकडुन खुलासा मागविलेला आहे.

मा.सभापती :पीएमसीवर आत्तापर्यंत किती वेळेस कार्यवाही झालेली आहे.

कार्य.अभियंता :पीएमसीवर आत्तापर्यंत आठ ते दहा वेळेस कार्यवाही केलेली आहे. पीएमसीवर 60 लाख रूपयांची पेनॅल्टी लावलेली आहे. करार रद्द करण्यात येईल म्हणुन कारणे दाखवा नोटीसही बजावलेली आहे

श्री.रेणुकादास वैद्य :भूमिगतच्या अहवालाबरोबर पीएमसीला वेळोवेळी दिलेल्या नोटीसाबाबतची माहिती पुढील सभेमध्ये माहिती देण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :भुमिगत गटार योजनेबाबत एक स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी.

कार्य.अभियंता :अंतर्गत लेखापरिक्षण चालू आहे. रिमार्क दिलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेड :चुका झालेल्या आपल्या समोर मांडायला पाहिजे.

कार्य.अभियंता :आर्थीक ऑडीट चालू आहे, एक माहिना कालावधी लागणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आठ दिवसात ऑडीट करण्यात यावे.

मा.सभापती :आठ दिवसात भूमिगत योजनेचे ऑडीट करण्यात यावे, ऑडीट करण्यासाठी आवश्यक स्टाफ ऑडिट विभागाला देण्यात यावा.

श्रीमती मनिषा मुंडे :एक महिना झालेला आहे शिवाजी पुतळा ते हनुमान मंदिर लाईन टाकुन देण्यात यावी. सतत पाठपुरावा करीत आहे. काम तात्काळ न झाल्यास उपोषनाला बसणार आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :काम चालू आहे.

मा.सभापती :तात्काळ काम करण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :वार्ड कार्यालय स्थलांतरितबाबत मुद्दा उपस्थित केला होता. माहिती देण्यात यावी. नागरीकांकरीता वार्ड कार्यालयात सुविधा नाही.

मा.सभापती :याबाबीची प्रशासनाने दखल घेण्यात यावी. स.सदस्यांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.अजीम अहमद :भुमिगत गटार योजनेचे लाईन टाकण्याचे काम झालेले आहे. परंतु दमडी महल, कटकटगेट रस्त्याचे काम तसेच ठेवलेले आहे.

कार्य.अभियंता :दमडी महल येथे कॉक्रींटीकरण केलेले आहे, डांबरीकरण सध्या होणार नाही, लेवल करण्यात आलेले आहे. तीन दिवसात कॉंक्रींटीकरण करण्यात येईल.

मा.सभापती :तात्काळ काम करण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :दिड महिण्यात गणेश उत्सव येत आहे. शहरातील रस्त्यांवर खड्डे पडलेले आहे त्याचे पॅचवर्क करण्यात यावे. गणेश विसर्जन विहिरींची सफाई करण्यात यावी, धुर फवारणी करण्यात यावी.

मा.सभापती :विसर्जन विहिरींची पाहाणी करण्यात यावी. विहिरींची साफसफाई करण्यात यावी, खड्डे बुझविण्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

श्री.सिध्दांत शिरसाठ :माझ्या वार्डात अतिक्रमण काढण्याबाबत एक महिन्यापासून पत्र व्यवहार करीत आहे, पंरतु अतिक्रमण काढलेले नाही.

मा.सभापती :होत असलेले अतिक्रमण झालेले अतिक्रमण बाबत एक महिण्यापासून पाठपूरावा करीत आहे पंरतु कारवाई झालेली नाही. खुलासा करण्यात यावा. आरटीओ ऑफिसचे अतिक्रमण, डिपी रोडवरील अतिक्रमण, रेल्वेस्टेशन येथील पेट्रोल पंपचे अतिक्रमण यामध्ये मा.कोर्टाचे आदेश आहेत, परंतु सदरील अतिक्रमण काढण्यात येत नाही. अधिकारी हे दिशाभुल करीत आहे. स.सदस्य यांनी उपस्थित केलेल्या अतिक्रमणा विषयीचे मुद्दे तसेच मा.न्यायालयाचे आदेश असतांना अतिक्रमण काढण्यात येत नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

अतिक्रमण विभाग प्रमुख : रेल्वेस्टेशन येथील पेट्रोल पंपचे अतिक्रमणबाबतचे मा.न्यायालयाची आदेशाची प्रत स.सदस्य यांनी कालच माझ्याकडे दिलेली आहे. या संबधीची संचिको व सर्व कागदपत्रे मागविण्यात आलेले आहे. सदर संचिकेची तसेच कागदपत्रांची तपासणी करून पुढील आवश्यक ती कारवाई करणार आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाचे आदेश आहेत स.सदस्य यांनी वारंवार पत्र व्यवहार केलेला आहे. रेल्वेस्टेशन हे शहराचे प्रवेशद्वार आहे. प्रवासी बाहेर पडल्यावर शहराचे चांगले चित्र दिसत नाही. हॉलीडे कॅम्पचे अतिक्रमण, मटन मार्केट अतिशय वाईट चित्र त्याच्यासमोर या पर्यटन राजधानीचे जाते, स.सदस्यांनी जे पत्र दिलेले आहे ते अतिशय बिकट आहे. मटन मार्केट, हातगाडया यांचे चित्र बदलणे आवश्यक आहे, पर्यटनाची राजधानीच्या दृष्टीने ते काढणे आवश्यक आहे, स.सदस्यांनी जो पत्रव्यवहार केलेला आहे. त्यावर प्रशासनाने तात्काळ कारवाई होईल अशी अपेक्षा आहे.

श्री.सिध्दांत शिरसाठ :सन 2014 पासून सदर विषय चालू आहे, दहा दिवसात कारवाई झाली पाहिजे.

मा.सभापती :रेल्वेस्टेशन येथील झालेले अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे. तत्कालीन आयुक्त श्री.बंड यांनीही पहाणी करून अहवाल दिला होता. त्या परवानग्या रद्द केलेल्या आहेत. प्रशासनाने स.सदस्य यांच्या पत्राची दखल घेवुन पाहणी करून 10 दिवसाच्या आत कारवाई करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल स्थायी समिती समोर सादर करण्यात यावा.

श्री.ऋषिकेष खैरे : सिल्लेखाना येथे तातडीने पाईपलाईन टाकण्यात यावी. सहा महिने झालेले आहे काम झालेले नाही.

विभाग प्रमुख (अतिक्रमण) :लाईन टाकायची आहे, त्या अलाईनमेंटमध्ये काही घरे बाधीत होत आहे, श्री.एम.एम.खान, अभियंता यांना सर्वेक्षणासंबधी आदेशित केलेले आहे. सर्व मालमत्तांना कायदेशिर नोटीस दिलेली आहे.

श्री.ऋषिकेश खैरे :नागरीकांशी चर्चा केलेली आहे, कुणाचीही हरकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :नागरीकांची काही हरकत नाही, अभियंते जावुन पाहणी करून लेखी हमी घेवुन सुध्दा स.श्री.एम.एम.खान हे सहया करीत नाही. नगरसेवकांची, तेथील नागरीकांची काही हरकत नसतांना लोकांना त्रास आहे.

मा.सभापती :त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. नागरीकांची तसेच नगरसेवकांची कुणाचीच काही हरकत नाही.

श्री.ऋषिकेश खैरे :काम केव्हा सुरू होणार खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता :जी सूचना केलेली आहे ती अतिशय योग्य आहे, गणेश मंदिरची एनओसी घेतलेली आहे. संबधीत कंत्राटदाराला लेखी सूचना दिलेली आहे जेवढा स्लॉप आहे, 200 मीटर काम करू शकतो,

श्री.ऋषिकेश खैरे :अतिक्रमण काढुन देण्यात यावे,

मा.सभापती :काम चालू करण्यात यावे सर्व नागरीक आणि स.सदस्य सहकार्य करण्यास तयार आहेत.

श्रीमती संगिता वाघुले :माझ्या वार्डात भुमिगत गटार योजनेचे काम झालेले आहे, एक महिना झालेला आहे, परंतु मेनसिव्हर लाईन जोडणीचे काम आजपर्यंत केलेले नाही त्यामुळे लाईन चालू झालेली नाही. याबाबतीत प्रशासनाला लाईन जोडणीबाबत वारंवार सांगीतले आहे. लाईन जोडणीचेच काम बाकी आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :लाईन जोडणीचेच काम बाकी आहे, दोन दिवसात कनेक्शन करून मेन सिव्हरला जोडणी करायची आहे. ती तातडीने जोडणी करून देण्यात येईल.

श्रीमती शे.नरगीस :नेहरू नगर येथील नाल्याची भिंत तुटल्यामुळे पाणी वाहत आहे.

कार्यकारी अभियंता :भिंतीचे काम आज चालू आहे. कामाबाबत रिपोर्ट आलेला आहे.

श्री.अजीम अहेमद :काम चालू झाल्याबाबत फोन करून विचारणा करण्यात यावी.

श्री.शेख मतीन :नेहरू नगर, कटकटगेट येथील कामे करण्यात येत नाही.

मा.सभापती :विषयांतर करण्यात येऊ नये, विषयासंबधीत चर्चा करण्यात यावी. बैठक संपल्यानंतर सदर विषयाबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रधानमंत्री आवास योजनेसंबधी टेंडर केव्हा काढण्यात आले होते, 19 जुलै 2016 रोजी जाहिरात देण्यात आली होती. कोणकोणत्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती, माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :ई टेंडर मार्फत जाहिरात देण्यात आली होती, त्यांचे मार्फत सर्व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती.

श्री.राजगौरव वानखेडे :जनपत्राचा या वर्तमानपत्राचा खप किती आहे, या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती, टेंडर 12 ऑगस्टला झाले, ओपन केव्हा करण्यात आले.

शहर अभियंता :29 मार्च 2017 रोजी टेंडर फायनल करण्यात आले.

श्री.राजगौरव वानखेडे :ऑगस्टमध्ये टेंडर मागविण्यात आले, पाच महिने टेंडर ओपन केले नाही, स्थायी समिती अस्तित्वात असतांना पाच टेंडर आले दोन अपात्र आणि तीन पात्र ठरविण्यात आले. मार्च 2017 च्या शेवटच्या सभेमध्ये ऐनवेळचा विषय म्हणुन ठेवण्यात आला. 2022 पर्यंत सर्वांना घरे द्यायचे आहे परंतु एक वर्ष विलंब झालेला आहे.

मा.सभापती :विलंब का झाला.

शहर अभियंता :प्रस्ताव रितसर स्थायी समितीमध्ये पुटअप केलेला आहे, मा.स्थायी समितीने त्यावर निर्णय घेतलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :विलंबाने ऐनवेळी प्रस्ताव आणला त्याचे कारण काय? त्यावर मा.आयुक्तांच्या स्वाक्षऱ्या नाही. तत्कालिन आयुक्तांना हया गोष्टी पटल्या नसत्या त्यांनी रिकॉल केले असते, मर्जीतल्या ठेकेदाराला टेंडर द्यायचे होते. त्यामुळे विलंब केलेला आहे.

शहर अभियंता :प्रस्तावाला मान्यता आहे. टेक्निकल बिड ओपन केल्यानंतर त्यानंतर फायनन्शीअल ओपन केले, दोन वेळेस कॉल केलेले आहे,

श्री.राजगौरव वानखेडे :आर्क कन्सल्टटंला काम दिले होते सिमा कंन्सलटेंटचा समावेश कसा झाला.

शहर अभियंता :Joint Venture आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सन 2007 साली गुंठेवारीच्या संचिका कंन्सल्टंटद्वारे महानगरपालिकेत सबमिट करण्यासंदर्भात निर्णय घेतलेला होता, जेणेकरून गुंठेवारी नियमित होईल हा उद्देश होता. परंतु या दोन एजन्सीने शहरात गुंठेवारीसंबधी धुमाकूळ घातला होता, या दोन एजन्सी ब्लॅकलीस्ट झालेल्या आहेत. सदरील एजन्सींना परत परत का आणण्यात येते. वारंवार या दोन एजन्सीचेच नांवे का येतात.याचा अभ्यास झाला पाहिजे. चौकशी झाली पाहिजे. एखादया अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी स.सदस्य श्री.वानखेडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांची चौकशी झाली पाहिजे. त्यानंतर या योजनेची पुढील कार्यवाही केली पाहिजे.

श्री.राजगौरव वानखेडे :चौकशी करण्याकरीता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. तो पर्यंत वर्क ऑर्डर देवु नये. सन 2006 पासूनची सदर एजन्सीची चौकशी करण्यात यावी.

मा.सभापती :स.सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती पुढील सभेत सादर करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :यांत्रिकी विभागातील 62 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत गेल्या पाच बैठकीपासून मुद्दा उपस्थित करीत आहे. प्रशासनाने काय कार्यवाही केली. येणाऱ्या बैठकीपर्यंत कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :या संदर्भातील संचिका मा.आयुक्तांकडे पाठविण्यात आलेली आहे.

मा.सभापती :पुढील बैठकीपुर्वी काय कार्यवाही केली याचा अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :एलईडी संदर्भात काही प्रश्न आहेत, निवीदा केव्हा झाली, वर्क ऑर्डर कधी दिली, टाईम पिरेड किती आहे.

मा.सभापती :माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता :ऐनवेळचा प्रश्न उपस्थित केलेला आहे, वर्क ऑर्डर देवुन आठ महिने झालेले आहे.

मा.सभापती :काम पुर्ण करण्याचा टाईम पिरेड किती आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सुप्रिम कोर्टाने निर्णय काय दिलेला आहे, काम पुर्ण करण्याचा टाईम पिरेड किती आहे. वर्क ऑर्डर कशाच्या आधारे दिलेली आहे.

शहर अभियंता :एलईडीचे टेंडर कॅन्सल केले होते, त्याच्या विरूध्द अपील केलेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयात महानगरपालिकेची बाजू योग्य रितीने मांडली गेलेली नाही.

विधी सल्लागार :सन 2015मध्ये सुप्रीम कोर्टात मॅटर होते, कोर्टाच्या निर्णयानुसार रिवाईज्ड वर्क ऑर्डर त्यांना देण्यात यावी. 2016 मध्ये जेव्हा त्यांना हेल्स् वर्क ऑर्डर देण्याचा प्रश्न

आला तेव्हा तत्कालीन आयुक्ताच्या असे निदर्शनास आले की, 2014 मध्ये ऑर्डर दिली होती आणि सन 2016 मधील जो रेट चालू होता त्यामध्ये तफावत होती. तेव्हा मा.सर्वसाधारण सभा व मा.स्थायी समितीचा ठराव घेवुन वर्क ऑर्डर रद्द केले होते, आणि सुप्रीम कोर्टामध्ये अपीलसाठी प्रस्तावित केले होते, त्यावेळेस त्यांनी कंन्टेम्ट दाखल केले. महानगरपालिकेने रिव्हयु पिटीशन दाखल केले होते, मा.न्यायालयाने ते फेटाळले. त्यांनंतर मा.न्यायालयाचे आदेशाचे पालन करू म्हणुन सांगण्यात आले व त्यांना रिवाईस् ऑर्डर देवु म्हणुन कळविण्यात आले.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.न्यायालयाचा सन्मान सर्वांनाच करावा लागेल. मा.सर्वसाधारण सभेमध्ये आला त्यावेळेस मा.तत्कालीन आयुक्तांनी यांची माहिती घेतली होती, जी वस्तु 3500 रूपयाला मिळते ती आज 35000 रूपये द्यावे लागत आहे.

शहर अभियंता :मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार महानगरपालिकेला स्कोअर अकाऊंट ओपन करायचे आहे. त्यामध्ये पैसे जमा करायचे आहे, त्यानंतर काम सुरू केल्यानंतर तीन महिन्याच्या आत त्यास पेमेंट करायचे आहे, अशी अट आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :वर्क ऑर्डर सोडुन संबधीताने एक पोलही पाहिलेला नाही. प्रशासनाला एवढी घाई कशासाठी, एक रूपयांचे कामही केलेले नसतांना त्यांचे खातेवर रक्कम जमा करायची आहे. सदर एजन्सीने काम केले असते तर गेल्या काही महिन्यात महानगरपालिकेने विद्युतवर केलेला खर्च वाचला असता, या गोष्टींची जबाबदारी कुणाची आहे.

शहर अभियंता :ॲग्रीमेंट केल्यानंतर काम सुरू करण्यास सांगण्यात आले, मुख्य रस्त्याचे काम सुरू करण्याचे सांगण्यात आले त्यावेळेस मनपा पेमेंट कशी देणार त्याच्यासाठी नियमानुसार मला पैसे देवुन टाका म्हणुन संबधीत एजन्सीने सांगीतलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :करारनाम्यामध्ये नमुद आहे की, हे काम केल्यावर एवढी रक्कम मिळेल, अशी टेंडरमध्ये प्रोव्हीजन आहे.

शहर अभियंता :स्क्रो खाते ओपन करायचे आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सदर नऊ महिन्यात सदर व्यक्ती काहीही काम करीत नाही. एका रस्त्याचे काम केलेले नाही, प्रशासनातर्फे एक नोटीसही देण्यात आलेली नाही. कामाचे टप्पे ठरवुन दिलेले आहे त्यानुसार काम करण्यात यावे. मा.न्यायालयात प्रकरणात मनपा हारली आहे परंतु मा.न्यायालयाचा आदर करण्यात येतो, सदरील काम हे 25 कोटी रूपयांमध्ये होण्यासारखे होते, परंतु कोर्टात निर्णय आपल्या विरूध्द लागला, संबधीताकडून चांगले काम करून घेणे ही आपली जबाबदारी आहे. करारनाम्याची प्रत सर्व स.सदस्यांना देण्यात यावी.

मा.सभापती :करारनाम्याची प्रत सर्व स.सदस्यांना देण्यात यावी. पेमेंट करण्यापुर्वी त्यांनी आत्तापर्यंम काम का करण्यात आले नाही म्हणुन संबधीतांना नोटीस देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :टेंडर टर्मिनेटची नोटीस देण्यात यावी.

शहर अभियंता :काम केलेले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :या शहराचे या संस्थेचे हित पाहण्यात यावे. टेंडर टर्मीनेट का करू नये म्हणुन नोटीस देण्यात यावी.

मा.सभापती :नोटीस देण्यात यावी.

श्री.शेख मतीन :विशेष धार्मीक दिवशी स्लॉटर हाऊस तसेच कत्तलखान्याला बंदी असते, या नियमाचे पालन करण्यात येते परंतु कत्तलखान्यातील कापले गेलेले एक दिवसापुर्वीचे मटन विक्रीवर बंदी नसावी. खाटीक संघटनेतर्फे विनंती करण्यात येते.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :कोणत्याही प्रकारची बंदी असलेल्या दिवशी कत्तल करण्यात येवु नये, दोन दिवसापुर्वी कत्तल केलेल्या मांस विक्री करण्यास कायद्यानुसार व नियमानुसार विक्री करण्यास परवानगी देण्यात यावी. |
| श्री.शेख मतीन | :जुन्या शहरातील हातगाडया काढण्यात येवु नये, गरीब जनता पोट भरते, हॉकर्स झोन तयार होईपर्यंत कारवाई करण्यात येवु नये. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहरातील अनाधिकृत हातगाडया हटविण्यात यावे, |
| मा.सभापती | :हॉकर्स झोन तयार तयार करण्यात यावे, जुन्या शहरातील हातगाडयांवर कारवाई करण्यात येवु नये, शहरातील अनाधिकृत हातगाडयांवर तातडीने कार्यवाही करावी. |
| श्री.सिताराम सुरे | :सिडको हडको तसेच जळगांव रस्ता ते सिडको बसस्टॅंड रस्त्यावरील लाईट बंद अवस्थेत आहे. वारंवार सांगुन काम होत नाही. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| उपअभियंता (विद्युत) | :कार्यवाही करण्यात येईल. केबल दुरूस्तीचे काम चालू आहे. |
| मा.सभापती | :श्री.के.डी.देशमुख, उपअभियंता यांनी वेळोवेळी स.सदस्यांनी केलेल्या तक्रांरींची दखल घेतलेली नाही, प्रशासनाने याची दखल घेवुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.सिताराम सुरे | :माझ्या वार्डाच्या कामाबाबत कंत्राटदाराने जीएसटी 18 टक्के लागत असल्याचे कारण पुढे केलेले आहे. |
| मुख्यलेखाधिकारी | :जीएसटी ही एक जुलै रोजी पासून लागू केलेली आहे ज्या कामाचा कालावधी एक जुलैपासून सुरू आहे त्यास जीएसटी लागू आहे. याबाबतीत सर्वांना अवगत केलेले आहे. स.सदस्यांच्या वार्डातील मंजुर काम तसेच वर्क ऑर्डर ही सहा महिन्यापुर्वीची आहे. |
| मा.आयुक्त | :नासिक महानगरपालिकेत दिनांक 22 जुलै रोजी कार्यशाळा आयोजित कलेली आहे जीएसटीबाबत औरंगाबादेतही तशी कार्यशाळा आयोजित होईल अशी अपेक्षा आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :काम करण्यास काहीच हरकत नाही. |
| मा.सभापती | :काम सुरू करण्याबाबत प्रशासनाने संबधीत कंत्राटदार यानां आदेशित करावे. |

**विषय क्र. 28 :** (विषय क्र.04 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.15/06/2017 (का.प.क्र.02) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे नागसेन कॉलनी येथील सामाजिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ तळ मजला व पहिला मजला एकुण क्षेत्रफळ 348 चौ.मी. असून सदरील सभागृह भाडेतत्वावर मिळणेसाठी अध्यक्ष संकल्प विकास मंडळ (सेवाभावी संस्था) नागसेन कॉलनी, औरंगाबाद ही संस्था हॉलचा वापर सेवाभावी कार्यासाठी करणार असल्याने यांनी प्रतीमाह रू.10,000/- प्रमाणे भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केलेली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे.

सदरील संस्थेच्या मागणी नुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.753, दि.20/02/2015 च्या ठरावानुसार संस्थेने सदरील सभागृहाची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक स्वखर्चाने करणेच्या व प्रतीमाह भाडे रू.10,000/- प्रमाणे व इतर कर वेगळे या अटीस अधीन राहून संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :विषय क्रमांक 28 |
| श्री.सिताराम सुरे | :किती वर्षासाठी आहे खुलासा करण्यात यावा. |
| मालमत्ता अधिकारी | : नागसेन कॉलनी येथील सभागृह पाच वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यात येणार आहे. |
| मा.सभापती | : करारनामा 5 वर्षाकरीता असेल, विषयास मंजूरी देण्यांत येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे नागसेन कॉलनी येथील सामाजिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ तळ मजला व पहिला मजला एकुण क्षेत्रफळ 348 चौ.मी. सदरील सभागृह अध्यक्ष, संकल्प विकास मंडळ (सेवाभावी संस्था) नागसेन कॉलनी, औरंगाबाद यांना भाडेतत्वावर देण्यास तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.753, दि.20/02/2015 च्या ठरावानुसार सदरील संस्थेने सभागृहाची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक स्वखर्चाने करणेच्या व प्रतीमाह भाडे रू.10,000/- प्रमाणे व इतर कर वेगळे या अटीस अधीन राहून संस्थेस सभागृहात झालेल्या चर्चेनुसार 05 वर्षापर्यंत भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 29 :**

दिनांक 15/06/2017 रोजी (का.प.क्र.-02) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती :विषय क्रमांक 29

श्री.सिताराम सुरे :इतिवृत्त कन्फरमेशनचा विषय सुरवातीला आला पाहिजे होता.

मा.सभापती :याची दखल प्रशासनाने घ्यावी विषय क्रमांक 29 मंजूर.

**ठराव :**

दिनांक 15/06/2017 रोजी (का.प.क्र.-02) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 30 : (उपअभियंता झोन क्र.09)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.09 कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.72,73,74,75,76,100 व 101 अंतर्गत मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे मान्सुनपूर्व पॅचवर्क व दुरूस्ती करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.49,95,441/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती पॅचवर्क या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.49,95,441/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 30

श्री.रेणुकादास वैद्य :झोन नं 9 मध्ये पॅचवर्क कामे का करण्यात येत आहे,शहरात इतर वार्डातही खड्डे आहेत.

शहर अभियंता :प्रत्येक झोनमध्ये पॅचवर्कचे अंदाजपत्रक तयार केलेले आहेत. सर्व वार्डमध्ये पॅचवर्क करण्यात येणार आहेत.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.09 कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.72,73,74,75,76,100 व 101 अंतर्गत मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे मान्सुनपूर्व पॅचवर्क व दुरूस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,95,441/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 31 : (कार्यकारी अभियंता झोन क्र.4,5,6,7,9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.91 जयभवानीनगर 13 वी योजना रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामाचे अंदाजपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.33,87,110/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.33,87,110/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 31 ते 33 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.91 जयभवानीनगर 13 वी योजना रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.33,87,110/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 32 : (प्र.शहर अभियंता)**

प्र.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.33 मीसरवाडी गल्ली नं.08 या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,99,279/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2016-17 मधील वार्ड अंतर्गत प्रो पुअर बजेट (नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग) या लेखाशिर्षामधुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 30/06/2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.33 मीसरवाडी गल्ली नं.8 या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे र.रू.29,99,279/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.33 मीसरवाडी गल्ली नं.08 या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.29,99,279/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 33 : (कार्य.अभियंता,ड्रेनेज)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.79 न्यायनगर येथे तिरूमला मंगल कार्यालयाजवळ औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजने अंतर्गत जलनि:सारण वाहीनीचे काम करण्यात आले आहे. त्याचवेळी येथे लगतच असलेली जुनी नादुरूस्त गटार असल्यामुळे पावसाचे तसेच इतर सांडपाणी ओव्हर फ्लो होऊन रस्त्यावर वाहते, त्यामुळे चिखल होऊन नागरीकांना तसेच वाहनधारकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीला तोंड द्यावे लागते. त्यासाठी अंदाजे 50.00 मीटर लांबीचे आर.सी.सी. पाईप टाकुण रस्ता क्रॉसींग केल्यास या भगातील नागरीकांना मोठा दिलासा मिळेल. यासाठी प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना आदेशित केले असता, त्यांनी या कामासाठी चालू मजिप्रा दरसुची नुसार रू.3,12,726/- एवढा खर्च येत असल्याचा अहवाल दिला आहे.

सदरचे काम करणे आवश्यक असून यासाठी एकुण 3,12,726/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर कामे औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेत समाविष्ठ करून योजनेतील अनुदानातून विशेष बाब म्हणुन खर्च करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.79 न्यायनगर येथे तिरूमला मंगल कार्यालयाजवळ औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजने अंतर्गत जलनि:सारण वाहीनीचे काम करण्यात आले असल्यामुळे व त्याचवेळी येथे लगतच असलेली जुनी नादुरूस्त गटार असल्यामुळे पावसाचे तसेच इतर सांडपाणी ओव्हर फ्लो होऊन रस्त्यावर वाहते, त्यासाठी अंदाजे 50.00 मीटर लांबीचे आर.सी.सी. पाईप टाकुण रस्ता क्रॉसींग करणेच्या कामासाठी येणाऱ्या र.रू.3,12,726/- एवढ्या अपेक्षित खर्चास तसेच सदर कामे औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेत समाविष्ठ करून योजनेतील अनुदानातून विशेष बाब म्हणुन खर्च करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 34 : (मालमत्ता विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे उस्मानपुरा, फुलेनगर येथील सभागृहाच्या लगतची अभ्यासिका अध्यक्ष स्नेहालय संस्था, अहमदनगर यांनी झोपडपट्टीतील गरीब मुलांच्या संगोपन करणेसाठी बाल भवनच्या वापरा करीता परिसरातील गरीब विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालविणेसाठीची मागणी आहे. सदर अभ्यासिकाचे क्षेत्रफळ 54 चौ.मी. ऐवढे असून त्यासाठी नाममात्र दराने म्हणजेच प्रतीमाह रू.1000/- प्रमाणे आकारणी केला आहे. सदर अभ्यासिकेची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत कार्यालयाने स्वखर्चाने करावयाच्या आहेत. महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 34

श्री.शेख मतीन :भाडे हे कमी आहे.

मालमत्ता अधिकारी :मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार 1000 प्रतीमाह नुसार भाडे दर निश्चित केलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील सर्व सभागृहासाठी नाममात्र 1000/- शुल्क आकारण्यात यावे.

मा.सभापती :विषय क्रमांक 34 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे उस्मानपुरा, फुलेनगर येथील सभागृहाच्या लगतची अभ्यासिका क्षेत्रफळ 54 चौ.मी., झोपडपट्टीतील गरीब मुलांच्या संगोपन करणेसाठी बाल भवनच्या वापरा करीता परिसरातील गरीब विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालविणेसाठी अध्यक्ष स्नेहालय संस्था, अहमदनगर यांना नाममात्र दराने म्हणजेच प्रतीमाह रू.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देणेस तसेच सदर अभ्यासिकेची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत कार्यालयाने स्वखर्चाने करणेस व महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 35 : (आरोग्य विभाग)**

आयुक्त प्रस्ताव सादर करत आहेत की, महानगरपालिकेच्या सिडको एन-8 रूग्णालय येथे शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय येथुन दंततज्ञ डॉक्टर येतात. त्यांच्याकडून दंतरोगाबाबत उपचार दिले जातात. याकरीता सेवाशुल्क आकारणीसाठी महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2013/प्र.क्र.462/भाग-2/आरोग्य 3,मंत्रालय,मुंबई दिनांक 28 डिसेंबर 2015 अन्वये दरआकारणी करावयाची आहे. मनपा सिडको एन-8 रूग्णालय येथुन खालीलप्रमाणे सेवा देण्यात येणार आहे. खालीलप्रमाणे सेवासाठी दर आकारणी करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवा/सुविधा | शासनाचे मंजुर दर रू./ घाटी रूग्णालयाचे दर रू. | मनपाचे प्रस्तावित दर रू. |
|---|---|---|---|
| 1 | बाह्य नोंदणी (7 दिवसाकरिता) | रू.10/- | रू.10/- |
| 2 | स्केंलींग व पॉलिशिंग | रू.50/- | रू.50/- |
| 3 | दातांची क्ष-किरण तपासणी | रू.25/- | रू.25/- |
| 4 | चांदी भरणे | रू.60/- | रू.60/- |
| 5 | सिमेंट भरणे | रू.30/- | रू.30/- |
| 6 | रूट कॅनल ट्रिटमेंट | रू.200/- | रू.200/- |
| 7 | पल्प कॅपिंग | रू.100/- | रू.100/- |
| 8 | लाईट क्युअर रेस्टोरेशन | रू.100/- | रू.100/- |
| 9 | दात काढणे | रू.30/- | रू.30/- |

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक जोरूपी-1000 प्र.क्र.90/2000 आरोग्य दिनांक 10/07/2001 नुसार अन्न व नागरी पुरवठा विभागाने वितरीत केलेल्या पिवळया रेशनकार्ड धारक रूग्णांना दारिद्रय रेषेखालील असे समजण्यात येईल व त्यांना मोफत आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यात येईल.

शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार ज्या संवर्गाना विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सवलत देण्यात आलेली आहे, त्या संवर्गाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. मनपाचे कर्मचारी व त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटूंबिय
02. मानव वैद्यकीय अधिकारी व शासकीय रूग्णालय व दवाखान्यातील परिचर्या कर्मचारी वर्ग
03. वैद्यकीय,निमवैद्यकीय तसेच व्यवसायोपचार भौतिकोपचार विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी
04. मा.न्यायाधीशांचे आदेशान्वये स्थानबध्द व्यक्ती
05. स्वातंत्र्यसंग्राम सैनिक व त्यांचे कुटूंबिय
06. न्याय वैद्यकिय प्रकरणातील औषधोपचारासाठी पाठविलेल्या व्यक्ती व न्याय चौकशी अधीन कैदी
07. पोलिसांतर्फे येणाऱ्या मेडिको लिगल केसेस
08. सुधारगृहातील रूग्ण
09. कुष्ठरोग मंडळाकडून येणारे रूग्ण
10. महिला सुधारगृहातर्फे येणारे रूग्ण
11. नागरी विभागातील बेवारशी मुले
12. आश्रम शाळेतील रूग्ण
13. मा.महापौर, मा.पदाधिकारी, स.नगरसेवक
14. मा.मंत्री, मा.खासदार,मा.आमदार,मा.सभापती व माजी आमदार
15. मा.न्यायाधीश
16. ज्येष्ठ नागरीकांकरीता

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 35

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील हॉस्पीटलचे Renewal संदर्भाने प्रश्न प्रलंबित आहे, सर्व नियमावली ठरलेली आहे परंतु अनेक हॉस्पीटलल्या परवानग्या रखडलेल्या आहेत. मा.आयुक्त यांचेस्तरांवर प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लावण्याबाबत कृपया आदेशित व्हावे.

मा.सभापती :शहरातील हॉस्पीटलचे Renewal License संदर्भाने मा.आयुक्त यांचे स्तरांवर प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लावण्यात यावे. विषय क्रमांक 35 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सिडको एन-8 रूग्णालय येथे शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय येथुन दंततज्ञ डॉक्टर येत असल्यामुळे व त्यांच्याकडून दंतरोगाबाबत उपचार दिले जात असल्याने, याकरीता सेवा शुल्क आकारणीसाठी महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2013/प्र.क्र.462/भाग 2/आरोग्य 3, मंत्रालय,मुंबई दिनांक 28 डिसेंबर 2015 अन्वये आकारावयाच्या दरास मान्यता देण्यांत येते. मनपा सिडको एन-8 रूग्णालय येथुन खालीलप्रमाणे देण्यांत येणाऱ्या सेवा व या सेवासाठी आकारणी करण्यांत येणाऱ्या मनपाच्या खालीलप्रमाणे प्रस्तावित दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | सेवा/सुविधा | मनपाचे प्रस्तावित दर रू. |
|---|---|---|
| 1 | बाह्य नोंदणी (7 दिवसाकरिता) | रू.10/- |
| 2 | स्केंलींग व पॉलिशिंग | रू.50/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | दातांची क्ष-किरण तपासणी | रू.25/- |
| 4 | चांदी भरणे | रू.60/- |
| 5 | सिमेंट भरणे | रू.30/- |
| 6 | रूट कॅनल ट्रिटमेंट | रू.200/- |
| 7 | पल्प कॅपिंग | रू.100/- |
| 8 | लाईट क्युअर रेस्टोरेशन | रू.100/- |
| 9 | दात काढणे | रू.30/- |

तसेच शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक जोरूपी-1000 प्र.क्र.90/2000 आरोग्य दिनांक 10/07/2001 नुसार अन्न व नागरी पुरवठा विभागाने वितरीत केलेल्या पिवळ्या रेशनकार्ड धारक रूग्णांना दारिद्र्य रेषेखालील असे समजण्यात येईल व त्यांना मोफत आरोग्य सेवा सुविधा पुरविण्यात येईल, तसेच शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.01 ते 16 नुसार ज्या संवर्गाना विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सवलत देण्यात आलेली आहे, त्यानुसार त्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 36 : (झोन क्र. 3)**

विषय : वार्ड क्र.57 संजयनगर भागातील हमजा मस्जीद खासगेट ते गंजेशहीदा कब्रस्थान समोरील मुख्य रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे. या कामाचे ठेकेदार सरवर खान जफर खान यांनी 0.50% कमी दराने करणेस संमती दिली आहे. टेंडर र.रू.44,97,505/- तरी माननीय स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र. 2016-MCA-177338-2

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | झोन क्र.3 |
| 2. | कामाचे स्वरुप | व्हॉईट टॉपींग कॉंक्रीट रस्ते |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | सोबत जोडले आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 44,97,505/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | - |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | - |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 25/04/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 3 तीन |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेक्‍दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | सरवर खान जफर खान | 4474859.46/- | -0.50% कमी दराने |
| 2 | शेख कंन्स्ट्रक्शन | 4551818.98/- | 1.21% जास्त दराने |
| 3 | कमर आयाज मो.जलालोद्दीन | 4597692.46/- | 2.23% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | आहे |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | आहे |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही<br>नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार | नविन कॉंक्रीट रस्ते |

| | | |
|---|---|---|
| | आहे? ते शिर्षक नमूद करावे. | |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | सोबत जोडला आहे. |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार सरवर खान जफर खान यांचेकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.44,75,112/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :विषय क्रमांक 36,37,38,39 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.57 संजयनगर भागातील हमजा मस्जीद खासगेट ते गंजेशहीदा कब्रस्थान समोरील मुख्य रस्त्यावर ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार सरवर खान जफर खान यांचेकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.44,75,112/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 37 : (उपअभियंता झोन क्र.05 सिडको)**

विषय : वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत सिपेट कॉलेज ते रमाई चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. या कामाचे ठेकेदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,82,215/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक / Tender ID-2017-AMCA-203366-1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभियंता झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.33 मिसारवाडी अंतर्गत सिपेट कॉलेज ते रमाई चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.28/12/2016 विषय क्र.110 अं.प. र.रू.49,82,714/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.49,82,714/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.शासन सम्राट<br>दिनांक 24/03/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.06/04/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.13/04/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 निविदा |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | अरबाज कन्स्ट्रक्शन | 49,82,215.61 | 0.01% कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | बिल्डवेल कन्स्ट्रक्शन | 51,52,126.15 | 3.40% जास्त |
| 3 | मे.स्टार कन्स्ट्रक्शन | 52,21,884.14 | 4.80% जास्त |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | शासन निर्णय क्र.जीईएन 2015/ प्र.क्र.82/नवि/16 दि.17 नोव्हेंबर 2015 तसेच शासन निर्णय क्र. जीईएन 2015/प्रक्र.82/नवि-16 दि.8 मार्च 2016 प्राप्त विशेष रस्ते योजना व सर्वसाधारण रस्ता अनुदान. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,82,215/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.33 मिसरवाडी अंतर्गत सिपेट कॉलेज ते रमाई चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.49,82,215/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 38 : (कार्यकारी अभियंता जलनिःसारण)**

विषय : भारतीय विमानसेवा प्राधिकरणाच्या सी.एस.आर. फंडातून महानगरपालिका शाळेमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह बांधणे या कामाचे ठेकेदार प्रभाकर मोहिते यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 3.11% कमी दराने करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender ID-2017-AMCA-206076-1

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (जलनिःसारण विभाग) |
| 2. | कामाचे स्वरुप | 19 मनपा शाळेमध्ये मुलींसाठी 27 स्वच्छतागृह बांधणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.882 दिनांक 18/02/2017 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.82,13,624/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-महा टेंडरद्वारे प्रसिध्दीस देण्यात आले होते. |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 01/04/2017 ते 29/04/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 02/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 (एक) (पहिल्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या आहेत.) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्राराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाकर गणपतराव मोहीते | 82,13,624/- | अ.प. दरापेक्षा 3.11% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | भारतीय विमानसेवा प्राधीकरण यांच्या सी.एस.आर. फंडातून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार प्रभाकर गणपतराव मोहिते यांचेकडून 3.11% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.82,13,624/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारतीय विमानसेवा प्राधिकरणाच्या सी.एस.आर. फंडातून महानगरपालिका शाळेमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह बांधणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार प्रभाकर गणपतराव मोहिते यांचेकडून 3.11% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.82,13,624/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 39 : (उप अभि. झोन क्र.05, सिडको)**

विषय : वार्ड क्र.35 अंतर्गत नाला (आनंदनगर) ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह ते कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. या कामाचे ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.40,23,284.89/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्रमांक /Tender ID-2016-AMCA-180933-3

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.35 अंतर्गत नाला (आनंदनगर) ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह ते कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिति सभा दि.24/11/2016 विषय क्र.81 अं.प. र.रू.40,63,514/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.40,63,514/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 18/01/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 27/01/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 1 निविदा |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे. ए.एस. कन्स्ट्रक्शन | 40,23,284.89/- | 0.99% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | भांडवली कामे व जलनि:सारण |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.40,23,284.89/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.35 अंतर्गत नाला (आनंदनगर) ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह ते कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.40,23,284.89/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 40 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.विजय मल्हारी अंभोरे, मजुर, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी मनपा प्रशासनास खोटे कागदपत्रे सादर करून फसवणुक केल्याबाबत त्यांना कार्यालयीन आदेश, जा.क्र./मनपा/आस्था-२/२०१६/६९४,दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये आदेश निर्गमनाच्या तारखेपासून महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२) (ह) प्रमाणे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती :विषय क्रमांक 40 ते 42 प्रशासनाने खुलासा सादर करावा.

उपआयुक्त (म) :श्री.विजय मल्हारी अंभारे, हे 1124 मध्ये सन 2004 साली मजूर म्हणुन नियुक्ती झालेली आहे आणि सन 2009 रोजी तक्रार आलेली आहे की, कागदपत्रे ही चुकीची आहेत, टिसी ही खोटी आहे, तक्रारदाराने न्यायालयात अपील दाखल केले. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पोलीसांना आदेशित करण्यात आले की टिसी बाबत अहवाल सादर करा त्यानुसार पोलीसांनी चौकशी करून मा.न्यायालयाला अहवाल सादर केलेला आहे, श्री.विजय यांचा जन्म 1956चा होता आणि लोणार येथे शिक्षण घेतले होते, मनपात नियुक्त होतांना नालंदा, बिडकीन, पैठण तालुक्याची टिसी दाखल केली. त्यामध्ये जन्म तारीख 1967 दाखविण्यात आली ती चुकीची आहे म्हणुन मा.न्यायालयाने अहवाल महानगरपालिकेकडे पाठविला. तसेच श्रीमती कमल विजय अंभोरे, यांची जन्म तारीख 1964 आहे. शिक्षण चिकना ता.बुलढाणा मनपामध्ये 6 वीपर्यंतचे शिक्षण झालेले तसेच 1967 जन्मतारीख दाखल केलेली आहे. पोलीस चौकशीमध्ये दोन्ही टिसी खोटे आढळुन आलेल्या आहेत. त्यानुषंगाने मा.आयुक्तांकडे सुनावणी झालेली आहे. 2003 मध्ये शासनाच्या सूचनेनुसार चुकीचे कागदपत्र दाखल केल्याचे सिध्द झाल्यानंतर त्याची सेवा समाप्त करण्यात यावी. त्यानुसार दोन्ही कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त केली. आपल्या निर्णयाच्या विरोधात जिल्हा कामगार न्यायालयात अपील दाखल केले. मा.न्यायालयाने सुनावणीअंती महानगरपालिकेचे आदेश कायम केले. संबधीताचे अपील फेटाळले आहे.

मा.सभापती : श्री.विजय मल्हारी अंभोरे, मजुर, मालमत्ता विभाग,मनपा यांनी स्थायी समिती समोर त्यांची झालेली बडतर्फी रद्द करावी, म्हणुन अपील दाखल केलेले आहे. यावर प्रशासनाने खुलासा सादर केला असता, यावरून असे दिसून येते की, त्यांनी बनावट टी.सी. तयार करून कार्यालयास सादर केली, ज्याची चौकशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिटी चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांनी प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांना सादर केलेल्या अहवालानुसार टि.सी. बनावट असल्याचे निष्पन्न झाले, तसेच बडतर्फी विरूध्द त्यांनी कामगार न्यायालयाकडे दाखल केलेले प्रकरण नामंजूर करण्यात आलेले आहे. करीता स्थायी समिती समोर संबंधीताने सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.विजय मल्हारी अंभोरे, मजुर, मालमत्ता विभाग,मनपा यांनी स्थायी समिती समोर त्यांची झालेली बडतर्फी रद्द करावी, म्हणुन अपील दाखल केलेले असल्यामुळे व यावर प्रशासनाने खुलासा सादर केला असता, यावरून असे दिसून येते की, त्यांनी बनावट टी.सी. तयार करून कार्यालयास सादर केली, ज्याची चौकशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिटी चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांनी प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांना सादर केलेल्या अहवालानुसार टि.सी. बनावट असल्याचे निष्पन्न झाले, तसेच बडतर्फी विरूध्द त्यांनी कामगार न्यायालयाकडे दाखल केलेले प्रकरण नामंजूर करण्यात आलेले असल्याने, प्रशासनाने संबंधीत कर्मचाऱ्यास बडतर्फ केल्याचा निर्णय कायम करण्यांत येतो, स्थायी समिती समोर संबंधीताने सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 41 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्रीमती कमल विजय अंभोरे, सेविका, वार्ड - ड कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांनी मनपा प्रशासनास खोटे कागदपत्रे सादर करून फसवणुक केल्याबाबत त्यांना कार्यालयीन आदेश, जा.क्र./मनपा/आस्था-२/२०१६/६९३, दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये आदेश निर्गमनाच्या तारखेपासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२) (ह) प्रमाणे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

उपआयुक्त (म) :श्री.विजय मल्हारी अंभारे, हे 1124 मध्ये सन 2004 साली मजूर म्हणुन नियुक्ती झालेली आहे आणि सन 2009 रोजी तक्रार आलेली आहे की, कागदपत्रे ही चुकीची आहेत, टिसी ही खोटी आहे, तक्रारदाराने न्यायालयात अपील दाखल केले. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पोलीसांना आदेशित करण्यात आले की टिसी बाबत अहवाल सादर करा त्यानुसार पोलीसांनी चौकशी करून मा.न्यायालयाला अहवाल सादर केलेला आहे, श्री.विजय यांचा जन्म 1956चा होता आणि लोणार येथे शिक्षण घेतले होते, मनपात नियुक्त होतांना नालंदा, बिडकीन, पैठण तालुक्याची टिसी दाखल केली. त्यामध्ये जन्म तारीख 1967 दाखविण्यात आली ती चुकीची आहे म्हणुन मा.न्यायालयाने अहवाल महानगरपालिकेकडे पाठविला. तसेच श्रीमती कमल विजय अंभोरे, यांची जन्म तारीख 1964 आहे. शिक्षण चिकना ता.बुलढाणा मनपामध्ये 6 वीपर्यंतचे शिक्षण झालेले तसेच 1967 जन्मतारीख दाखल केलेली आहे. पोलीस चौकशीमध्ये दोन्ही टिसी खोटे आढळुन आलेल्या आहेत. त्यानुषंगाने मा.आयुक्तांकडे सुनावणी झालेली आहे. 2003 मध्ये शासनाच्या सूचनेनुसार चुकीचे कागदपत्र दाखल केल्याचे सिध्द झाल्यानंतर त्याची सेवा समाप्त करण्यात यावी. त्यानुसार दोन्ही कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त केली. आपल्या निर्णयाच्या विरोधात जिल्हा कामगार न्यायालयात अपील दाखल केले. मा.न्यायालयाने सुनावणीअंती महानगरपालिकेचे आदेश कायम केले. संबधीताचे अपील फेटाळले आहे.

मा.सभापती : श्रीमती कमल विजय अंभोरे, सेविका, वॉर्ड-ड कार्यालय,मनपा,यांनी स्थायी समिती समोर त्यांची झालेली बडतर्फी रद्द करावी, म्हणुन अपील दाखल केलेले आहे. यावर प्रशासनाने खुलासा सादर केला असता, यावरून असे दिसून येते की, त्यांनी बनावट टी.सी. तयार करून कार्यालयास सादर केली, ज्याची चौकशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिटी चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांनी प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांना सादर केलेल्या अहवालानुसार टि.सी. बनावट असल्याचे निष्पन्न झाले, तसेच बडतर्फी विरूध्द त्यांनी कामगार न्यायालयाकडे दाखल केलेले प्रकरण नामंजूर करण्यात आलेले आहे. करीता स्थायी समिती समोर संबंधीताने सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्रीमती कमल विजय अंभोरे, सेविका, वार्ड-ड कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर त्यांची झालेली बडतर्फी रद्द करावी, म्हणुन अपील दाखल केलेले असल्यामुळे व यावर प्रशासनाने खुलासा सादर केला असता, यावरून असे दिसून येते की, त्यांनी बनावट टी.सी. तयार करून कार्यालयास सादर केली, ज्याची चौकशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिटी चौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांनी प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी यांना सादर केलेल्या अहवालानुसार टि.सी. बनावट असल्याचे निष्पन्न झाले, तसेच बडतर्फी विरूध्द त्यांनी कामगार न्यायालयाकडे दाखल केलेले प्रकरण

नामंजूर करण्यात आलेले असल्याने, प्रशासनाने संबंधीत कर्मचाऱ्यास बडतर्फ केल्याचा निर्णय कायम करण्यांत येतो, स्थायी समिती समोर संबंधीताने सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 42 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.जगन संभाजी बनसोडे, सफाई मजुर, वार्ड कार्यालय क्र.- ५ महानगरपालिका औरंगाबाद यांची लाड समितीच्या शिफारसीनुसार झालेल्या नियुक्तीस आक्षेप आल्यानुसार, त्यांना कार्यालयीन आदेश, जा.क्र./मनपा/आस्था-२/२०१६/१३५७, दिनांक १५/१२/२०१६ अन्वये आदेश निर्गमनाच्या तारखेपासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६ (२) (ग) प्रमाणे महानगरपालिकेतून सेवा समाप्त केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : विषय क्र.४२ वर प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : श्री.बाळा बनसोडे हे महानगरपालिकेत सन १९८८ ला गँगमजूर म्हणुन कार्यरत होते, सन १९८८ ला सेवानिवृत्त झाले, १६ वर्षानंतर त्यांचे नातु याने अर्ज दाखल केला की, माझे आजोबा सफाई मजुर म्हणुन महानगरपालिकेत कार्यरत होते, त्यांचे जागेवर मला नियुक्ती द्यावी. सन २००४ साली समितीने निर्णय देवून त्यांना नियुक्ती दिली, त्याच्यानंतर सन २००९ या वर्षी श्रीमती कमलबाई विजय बनसोडे यांनी हरकत दाखल केली. त्यांच्या म्हणण्यानुसार श्री.जगन संभाजी बनसोडे यांचा माझ्या परिवाराशी काहीही संबंध नाही, त्यांची नियुक्ती चुकीची झालेली आहे. श्रीमती कमलबाई बनसोडे यांच्या तक्रारीनुसार मा.आयुक्त यांचेकडे सुनावणी झाली. श्री.बाळा बनसोडे यांची फॅमिली ट्रि काढण्यात आली. फॅमिली ट्रि मध्ये संबंधीत श्री.जगन बनसोडे हे कुठेही बसलेले नाही. तसेच लाड समितीच्या शिफारशी ह्या सफाई कामगारांसाठी आहे. श्री.बाळा बनसोडे हे गँग मजूर म्हणुन कार्यरत होते, म्हणुन झालेली नियुक्ती रद्द करून सेवा समाप्त केली.

मा.सभापती : श्री.जगन संभाजी बनसोडे, सफाई मजुर, वार्ड कार्यालय क्र.-5 मनपा यांनी स्थायी समिती समोर त्यांची झालेली बडतर्फी रद्द करावी, म्हणुन अपील दाखल केलेले आहे. त्यानुसार असे दिसून येते की, श्री.बाळा बनसोडे यांचे नातेवाईक म्हणुन श्री.जगन संभाजी बनसोडे यांनी लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देणे बाबत विनंती केली होती, सन 2004 मध्ये संबंधीतास सफाई मजुर या पदावर नियुक्ती देण्यांत आली, तथापी श्री.बाळा बनसोडे हे गँग मजुर या पदावर कार्यरत होते आणि श्रीमती कमलबाई बनसोडे यांच्या तक्रारीनुसार मा.आयुक्त यांचेकडे झालेल्या सुनावणीत श्री.जगन संभाजी बनसोडे हे श्री.बाळा बनसोडे यांचे नातु असल्याचे सिध्द करू शकले नाही, या दोन्ही बाबींचा विचार करता संबंधीतास लाड समितीच्या शिफारशीनुसार देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्याचा प्रशासनाचा निर्णय कायम करण्यांत येतो, करीता स्थायी समिती समोर संबंधीताने सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.जगन संभाजी बनसोडे, सफाई मजुर (बडतर्फ) वार्ड कार्यालय क्र.- ५ महानगरपालिका औरंगाबाद यांनी महानगरपालिकेतून सेवा समाप्त केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय होऊन, श्री.बाळा बनसोडे यांचे नातेवाईक म्हणुन श्री.जगन संभाजी बनसोडे यांनी लाड समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती देणे बाबत विनंती केली होती, सन 2004 मध्ये संबंधीतास सफाई मजुर या पदावर नियुक्ती देण्यांत आली, तथापी श्री.बाळा बनसोडे हे गँग मजुर

या पदावर कार्यरत होते आणि श्रीमती कमलबाई बनसोडे यांच्या तक्रारीनुसार मा.आयुक्त यांचेकडे झालेल्या सुनावणीत श्री.जगन संभाजी बनसोडे हे श्री.बाळा बनसोडे यांचे नातु असल्याचे सिध्द करू शकले नाही, या दोन्ही बाबींचा विचार करता संबंधीतास लाड समितीच्या शिफारशीनुसार देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्याचा प्रशासनाचा निर्णय कायम करण्यांत येतो. स्थायी समिती समोर संबंधीताने सादर केलेले अपील फेटाळण्यात येत आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. 43 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक 02 अंतर्गत विविध मुख्य रस्त्यांचे (खड्डे दुरूस्ती) डांबराद्वारे पॅचवर्क करणे बाबत या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,94,350/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2017-18 मधील रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कमे मधुन उपलब्ध करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,94,350/- मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 43 ते 47 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक 02 अंतर्गत विविध मुख्य रस्त्यांचे (खड्डे दुरूस्ती) डांबराद्वारे पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 49,94,350/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 44 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.112 शिवाजीनगर वार्डातील साईनगर, भारतनगर, भागात 100 मी.मी., 150 मी.मी., 200 मी.मी. Dia डी.आय.के.-7 जलवाहिन्या टाकण्याचे कामाचे एकूण अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,99,518.00/- करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर आर्थिक तरतुद उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, कार्यालय यांचेकडे जा.क्र./मनपा/काअ/पापु/380/2017 दिनांक 14/02/2017 नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

याकरीता मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडून सदरील कामासाठी जा.क्र./2017/न.पा.प्र./द.व.सु.यो.प्र.भा/मनपा, औ/का.वि./151/2017 दि.30/03/2017 नुसार रक्कम रूपये 25.00 लक्ष तरतुद उपलब्ध झालेली आहे. उर्वरीत तरतुद रक्कम रूपये 20,67,514.00/- महानगरपालिका बजेटमधुन वार्ड-07 भांडवली कामे पाणी पुरवठा, पान क्रमांक 60 अ.क्र.04 नुसार रूपये 20.00 लक्ष उपलब्ध आहे.

मा.जिल्हाधिकारी यांचेकडे 100 मी.मी., 150 मी.मी., 200 मी.मी. dia डी.आय.के.-7 जलवाहिन्या टाकण्या बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता, परंतु स.नगरसेवक श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ यांचे विनंती पत्रानुसार 110 मी.मी. 160 मी.मी., 200 मी.मी., 250 मी.मी. 315 मी.मी. dia H.D.P.E. जलवाहिन्या टाकण्या बाबतचे सुधारीत अंदाजपत्रक रूपये 45,67,514.00/- तयार करण्यात आले, असून त्यास तांत्रिक मान्यता देऊन सुधारीत अंदाजपत्रक रूपये 45,67,514/- किमंतीच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथापी विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.112 शिवाजीनगर वार्डातील साईनगर, भारतनगर, भागात 110 मी.मी. 160 मी.मी., 200 मी.मी., 250 मी.मी. 315 मी.मी. dia H.D.P.E. जलवाहिन्या टाकण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत र.रू.45,67,514/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 45 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरास 1219 मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होतो. सदर जलवाहिनी जायकवाडी ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत रस्त्याच्या बाजूने टाकण्यात आली आहे. भविष्यामध्ये औरंगाबाद पैठण राज्य रस्ता क्र.30 चे रूंदीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात येत आहे. संबंधीत विभागाने औरंगाबाद ते पैठणकडे जाताना राज्य रस्ता क्र.30 च्या उजव्या बाजुला बिडकीनपुढे हॉटेल आनंद रेस्टॉरंट समोर 1219 मी.मी. व्यासाची मुख्य पौलादी अशुध्द जलवाहीनी भविष्यात रस्ता रूंदीकरणामध्ये बाधीत होत असल्यामुळे, साधारणतः 150 मीटर लांबीची जलवाहिनी लवकरात लवकर स्थलांतरीत करणेबाबत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका औरंगाबाद यांना चर्चेमध्ये सांगितले आहे.

वर नमुद अस्तित्वातील बाधित होणारी 150 मीटर लांबीची जलवाहिनी सद्यस्थितीत काही लांबीमध्ये चेअरवर टाकण्यात आली आहे. सदर ठिकाणी जलवाहिनी स्थलांतरीत करणेसाठी नाला बेड खाली टाकावी लागेल. यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुचीनुसार दर घेऊन एकत्रित रूपये 48,63,100/- किमंतीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यामध्ये 160 मीटर लांबीचे 1219 मी.मी. व 8.7 मी.मी. जाडीचे पोलादी पाईप पुरविणे व अंथरणे तसेच हायड्रॉलिक टेस्टींगचा समावेश आहे. याच अंदाजपत्रकामध्ये मागावून अस्तीत्वातील 1219 मी.मी. व्यासाचे अस्तित्वातील पाईप काढून भविष्यातील देखभाल दुरूस्तीसाठी फारोळा येथे वाहतुक करून भांडारात ठेवण्याचा देखील समावेश आहे.

प्रस्तावीत 150 मीटर लांबीची जलवाहिनी टाकल्यानंतर 2 ठिकाणी अस्तित्वातील जलवाहिनीला आडवी जोडणी करावी लागणार आहे. यासाठी नविन योजनेवर साधारणतः 36 तासांचा खंडणकाळ भविष्यात घेऊन जलवाहिनी कार्यान्वित करावी लागेल.

करीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणीनुसार बिडकीनपुढे आनंद रेस्टॉरंट समोर 150 मीटर लांबीची 1219 मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतर करण्यासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 48,63,100/- व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरास 1219 मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होणाऱ्या व जलवाहिनी जायकवाडी ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्रा पर्यंत रस्त्याच्या बाजूने टाकण्यात आली असल्यामुळे आणि भविष्यामध्ये औरंगाबाद पैठण राज्य रस्ता क्र.30 चे रूंदीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात येत असल्याने, बिडकीनपुढे आनंद रेस्टॉरंट समोर 150 मीटर लांबीची 1219 मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतर करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 48,63,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 46 :**

विषय : वार्ड क्र.77 हेडगेवार रूग्णालय ते बँक ऑफ इंडिया पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांचेकडून .99% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.83,97,481.57/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. AMCA-204389-1 सन 2017-2018

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - झोन क्र.4 ते 7 व 9 कार्यालय |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.77 हेडगेवार रूग्णालय ते बँक ऑफ इंडिया पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. |

| | | |
|---|---|---|
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 84,81,450/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 84,81,447.90/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 27/03/2017 ते 26/04/2017 30 दिवस |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 29/04/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | चार टेंडर |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्काराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर | 84,81,447.90 | .99% कमी दराने |
| 2 | पार्थ कंस्ट्रक्शन | 84,81,447.90 | 3.00% जास्त दराने |
| 3 | एस.डी. दौंडे कंस्ट्रक्शन | 84,81,447.90 | 3.99% जास्त दराने |
| 4 | आर.व्ही.चव्हाण | 84,81,447.90 | 5.00% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित प्रकरणी अंदाजपत्रकीय मंजुरी व काम ठेकेदार मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांचेकडून .99% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.83,97,481.57/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.77 हेडगेवार रूग्णालय ते बँक ऑफ इंडिया पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांचेकडून .99% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.83,97,481.57/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 47 :</u>**

विषय : वार्ड क्र.61 अलतमश कॉलनी येथील दरबार हॉटेल ते राममंदिर पर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामाचे ठेकेदार जे.एस. कन्स्ट्रक्शन, यांचेकडून 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.99,90,205/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र. 2017-AMCA-190824-6, सन 2016-2017

महोदय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उपअभियंता - झोन क्र.3 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे व्हाईटटॉपींग करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रू.99,90,205/- मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.834, दिनांक 29/12/2016 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.99,90,205/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेन्डर विभाग पत्र जा.क्र./मनपा/ई-निविदा/2016, दिनांक |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 15/06/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | जे.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी | 99,90,205/- | 0.50% कमी (वाटाघाटीअंती) |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमूद करावीत. | नाही<br>निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे (सन 2016-17) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | महानगरपालिका फंडातून |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | निरंक |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयाकिंत काम जे.एस.कंन्स्ट्रक्शन कंपनी, कंत्राटदार, यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी या दराने निविदा दाखल केली आहे. तरी सदरील काम जे.एस. कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.99,40,254/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.61 अलतमश कॉलनी येथील दरबार हॉटेल ते राममंदिर पर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक जे.एस.कंन्स्ट्रक्शन कंपनी, कंत्राटदार, यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.99,40,254/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणे/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 48 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 137 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जातात. सर्व बालवाडी वर्गाचे एकूण 3306 विद्यार्थी आहेत, हे विद्यार्थी साधारणपणे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असतात. यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असतो. ह्या वयोगटातील मुलांच्या शारिरीक व बौध्दीक विकासासाठी सकस आहारांची अत्यंत आवश्यकता असते. तो त्यांना न मिळाल्यास ह्या वयात कुपोषण होऊन त्यांचा शारिरीक व बौध्दीक विकास खुंटला जातो. त्यानंतरच्या वयात तो भरुन निघणे अवघड असते. याबाबीचा विचार करुन महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" चालु करणे गरजेचे वाटते.

1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेचा फायदा मिळतो पण बालवाडीसाठी सध्यातरी कुठलीही योजना नाही. काही मनपाच्या शालेय इमारतीत बालवाडीचे वर्ग चालतात तेथील बालवाडीच्या विद्यार्थ्यांना शाळेतील अनुपस्थित विद्यार्थ्यांचा उरलेला आहार दिला जातो, तो नेहमी पुरेसा नसतो. ज्या बालवाड्यात शालेय इमारतीच्या बाहेर म्हणजे विविध स्लम भागात आहे. त्यांना कुठलाही पोषण आहार मिळत नाही. अशा प्रकारे पोषण आहार तफावत आहे ती तशी न राहता सर्वांना पुरेसा व त्यांच्या हक्काचा आहार मिळाला पाहीजे यासाठी महानगरपालिकेच्या 1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार हा इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन, मुंबई यांच्यामार्फत देण्यात येतो. तो अत्यंत चांगला, स्वच्छ व गरम असा असतो. याच धर्तीवर इस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशनाचा पोषण आहार बालवाड्यांसाठी मागील दोन वर्षापासून देण्यात येत आहे. पोषण आहाराचा दर्जा चांगला असल्याकारणाने सन 2017-18 या शैक्षणिक वर्षासाठी पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी इस्कॉन फूड रिलीफ फाउन्डेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्तावित करण्यात येत आहे.

बालवाडी पोषण आहारास लागणारे साहित्य (तांदुळ, दाळ, भाज्या, तुप, मसाला, इत्यादी.) उपलब्ध करुन घेणे, तो शिजवणे, तो बालवाडीपर्यंत पोहचवणे अशी संपूर्ण जबाबदारी ही इस्कॉन फूड रिलीफ फाऊंडेशनची असेल. ह्या संपूर्ण जबाबदारीसाठी महानगरपालिकेने रू.6.20 पै./- प्रति दिन/प्रति लाभार्थी असे दर ठरविले आहेत.

त्याप्रमाणे 3300 विद्यार्थी x रु.6.20 = **रू.20,460/-** प्रति दिन यानुसार एकूण वर्षभरात अंदाजे 220 कार्य दिवस (सुटयांचे दिवस वगळता) पोषण आहार द्यावा लागतो. म्हणजेच 220 x 20,460 = **रू.45,01,200/-** एवढा अंदाजित खर्च संपूर्ण वर्षासाठी येईल.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 66(1)(3) मध्ये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतूद करता येईल, अशा बाबीमध्ये शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतुद करणे याबाबीचा समावेश आहे.**

बालवाड्यांतील विद्यार्थ्यांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असा आहे, त्यांना जरुरी उष्मांक मिळण्यासाठी पुरक आहाराची गरज आहे. त्यामुळे दुधा ऐवजी मनपा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बाबत. **मा.सर्वसाधारण सभा दि.18/10/2012 ठराव क्र. 906 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे**. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन-2017-18 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषणआहार योजनेस लागणारा एकुण खर्च रु.45,01,200/- (अंदाजित) खर्चाच्या मान्यतेस्तव सादर. तसेच सदर पोषण आहार हा इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविणेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 48

श्री.राजगौरव वानखेडे :अत्यंत चांगले तसेच स्वादिष्ट खिचडी इस्कॉन तर्फे देण्यात येते, इस्कॉनचे बील वेळेवर देण्याबाबत प्रशासनाला आदेशित करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी सूचीत केल्यानुसार इस्कॉन मोठी व नावाजलेली संस्था आहे. एक चांगले सामाजिक काम त्यांच्या माध्यमातुन होत आहे. प्रशासनाने खिचडीचे बील वेळेवर देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 137 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जात असून सर्व बालवाडी वर्गातील एकूण 3306 विद्यार्थी हे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असून त्यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असल्यामुळे, महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना "पोषण आहार" उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन 2017-18 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस लागणारा एकुण र.रु.45,01,200/- (अंदाजित) खर्चास तसेच सदर पोषण आहार हा इस्कॉन फूड फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 49 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर समांतर जलवाहिनी प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत होता. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि. (कन्सेशनर) यांनी प्रकल्पामध्ये अनेक अनियमितता केल्यामुळे महानगरपालिकेने दिनांक 01.10.2016 रोजी संबंधीतांना Terminate केले आहे. तेंव्हा पासुन पाणी पुरवठा विषयक सर्व कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

- शहरातील विविध भागात पाणी पुरवठा करण्यासाठी 5000 लि. क्षमतेचे 65 व 10,000 लि. क्षमतेचे दोन टँकर भाडेतत्वावर लावण्यासाठी सातारा-देवळाई भागात पाणी पुरवठा करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार रक्कम रुपये 5,03,28,025/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.
- कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/उअ (जायां)/211 दिनांक 07.10.2016 नुसार सातारा-देवळाई परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी लावण्यात आलेल्या भाडेतत्वावरील वॉटर टँकरचे दर खालील प्रमाणे आहे.

| 1 मे.टन | |
|---|---|
| प्रति दिन भाडे | प्रति किमी भाडे |
| रु. 175/- (रुपये एकशे पंच्याहत्तर) | रु. 2.30 (दोन रुपये तीस पैसे) |

- सदरील अं.प.रक्कम रु 5,03,28,025/- च्या खर्चास दिं.13.10.2016 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केली.
- मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.693 दिं 13.10.2016 प्रमाणे वॉटर टँकर भाडेतत्वावर घेण्यासाठी मान्यता घेण्यात आली सदरील ठरावाची प्रत दिनांक 01.11.2016 रोजी प्राप्त झाली.
- मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर निविदा प्रारुप तयार करुन दिनांक 07.11.2016 रोजी निविदा प्रसिध्दीस ई-टेन्डर विभागास देण्यात आली.
- सदरील निविदा ई-टेन्डर विभागाने दिनांक 17.11.2016 रोजी प्रसिध्द केली.
- निविदा प्रसिध्द केल्यानंतर या कामासाठी चांगल्या एजन्सी मिळण्याच्या दृष्टिने दिनांक 13.12.2016 रोजी "ज्या निविदाधारकांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे/असून आणि ज्यांना अठ्ठेचाळीस (48) तास किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची पोलीस कोठडी झालेली आहे, असे कंत्राटदार निविदा भरण्यास पात्र होणार नाही." असे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले.

- दिनांक 16.01.2017 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे श्री.संजय पवार तत्कालीन मुख्य लेखाधिकारी यांच्या संमवेत झालेल्या चर्चेप्रमाणे वरील अट रद्द करण्यासाठी आदेशीत केले. त्याप्रमाणे सदरील अट दिनांक 17.01.2017 रोजी रद्द करुन शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले.
- प्रथम वेळेस एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे जास्तीच्या निविदा प्राप्त होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली.
- दुसऱ्या वेळेस मुदतवाढ देऊन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा दाखल करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत (दिं.19.01.2017) एकुण चार निविदा प्राप्त झाल्या.
- प्राप्त चार निविदांची तांत्रिक बिड उघडण्यात आली.
- प्राप्त चारही निविदा तांत्रिक दृष्ट्या योग्य नसल्यामुळे फेरनिविदा मागविण्याच्या मान्यतेसाठी संचिका दिनांक 01.02.2017 रोजी सादर करण्यात आली.
- मा.आयुक्त महोदय यांची फेरनिविदा मागविणेसाठी दिनांक 18.02.2017 रोजी मान्यता मिळाली.
- दिनांक 21.02.2017 रोजी विभागास संचिका प्राप्त झाल्या नंतर दिनांक 22.02.2017 रोजी तिसरी वेळेस फेरनिविदा मागविण्यात आल्या.
- तिसरी वेळेस निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख दिनांक 15.03.2017 होती.
- तिसऱ्या वेळेस सुध्दा एकही निविदा प्राप्त झाली नाही.
- चौथ्या वेळेस निविदा प्रसिध्द करण्यात आली असता दिनांक 26.04.2017 रोजी एकही निविदा प्राप्त झाली नाही.
- अटी व शर्तीमध्ये शितीलता करुन पुन्हा निविदा काढण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक 16.06.2017 रोजी मिळाल्यानुसार दिनांक 17.06.2017 रोजी फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली. एकच निविदा प्राप्त झाल्याने निविदेस मुदतवाढ देण्यात आली. मुदतवाढ देऊनही दिनांक 30.06.2017 पर्यंत एकच निविदा प्रापत झाल्याने दिनांक 01.07.2017 रोजी फेर निविदा मागविण्यात आली आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे दर**

| **अ.क्र** | **क्षमता** | **प्रतिदिन भाडे** | **प्रति किलो मीटर भाडे दर रुपये- पैसे** |
|---|---|---|---|
| | प्रति 1 मॅट्रीक टन | रु. 148/- | रु. 1.80 |
| 1 | 5000 लि. (5 मे. टन) | रु. 740/- | रु. 9.00 |
| 2 | 10000 लि. (10 मे. टन) | रु. 1480/- | रु. 18.00 |
| **सातारा-देवळाई पाणी पुरवठा मंजुर दर** | | | |
| 1 | 5000 लि./ 10000 लि. (5/10 मे. टन) | रु. 175/- | रु. 2.30 |

**औरंगाबाद वॉटर युटिलिटीचे मंजुर दर, मे.गोल्ड कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद**

| **अ.क्र** | **क्षमता** | **प्रति ट्रीप** |
|---|---|---|
| 1 | 5000 लि. | रु. 350/- |
| 2 | 10000 लि. | रु. 720/- |

**दररोज साधारणपणे टँकरसाठी येणारा खर्च (तक्ता-अ)**

| अ.क्र | क्षमता | सरासरी रनिंग किमी | मनपा दर | जिल्हाधिकारी कार्यालय | औरंगाबाद वॉटर युटिलिटी | सातारा देवळाई |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5000लि. | 80 किमी | रु.3146/- | रु.(740+720) = 1460/- | रु.(350x8) 2800/- | रु.(875+920) = 1795/- |
| 2 | 10000 लि. | 60 किमी | रु.3899/- | रु.(1480+1080) = रु.2560/- | रु.(720x5) रु.3600/- | रु.(1750+1380) = 3130/- |

पाणी पुरवठ्याचे सोबतच्या तक्यात तुलनात्मक दर पाहता सातारा देवळाईचे कंत्राटदाराकडून हे काम करुन घेणे महानगरपालिकेच्या हिताचे होते. त्यामुळे कामाची तातडी पाहता महाराष्ट्र महानगरपालिकेचे अधिनियम कलम 67 (3) (क) मध्ये मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद हे अगोदर पासुन महानगरपालिकेत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणारे ठेकेदार असून, त्यांना हे काम देण्यात आले आहे. ही पर्यायी व्यवस्था निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून, Stop-Gap Arrangement आहे. शहरासाठी काढण्यात आलेली निविदा अंतिम होई पर्यंत हे काम त्यांना मा.आयुक्त यांची मंजुरी घेऊन या कार्यालयाचे आदेश क्र. मनपा/काअ/पापु/2017/40 दि.04.02.2017 अन्वये देण्यात आलेले आहे. निविदा अंतिम झाल्यास कोणत्याही क्षणी या कामाचे आदेश रद्द करण्यात येणार आहेत.

आदेशाप्रमाणे ठेकेदाराने दि. 01.05.2017 ते 31.05.2017 पर्यंत 85 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला आहे त्याचे देयक रक्कम रुपये 43,72,476/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून रक्कम रुपये 41,97,577/- इतके अदा करण्यात आलेले आहे. त्यास कार्योत्तर मान्यता व दि. 01.06.2017 ते 30.06.2017 पर्यंत 83 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला आहे त्याचे देयक रक्कम रुपये 39,68,149/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून रक्कम रुपये 38,09,423/- इतके अदा करण्याकरीता मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 49 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध भागात पाणी पुरवठा करण्यासाठी ठेकेदार मे.शेख कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी दि. 01.05.2017 ते 31.05.2017 पर्यंत 85 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला असल्यामुळे, त्याचे देयक रक्कम रुपये 43,72,476/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून अदा करण्यांत आलेल्या रक्कम रुपये 41,97,577/- चे देयकास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते, तसेच दि. 01.06.2017 ते 30.06.2017 पर्यंत 83 टँकरमार्फत शहरात पाणी पुरवठा केलेला असल्यामुळे, त्याचे देयक रक्कम रुपये 39,68,149/- 2% आयकर कपात व 2% सुरक्षा अनामत रक्कम वगळून रक्कम रुपये 38,09,423/- इतके देयक अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद